महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन
२५ मर्झबान पथ, फोर्ट, मुंबई ४००००१

ईमेल :- deepak.raut@nic.in
दूरध्वनी :- ०२२ -२२०६०४४२

---

क्रमांक न्यायप्र-२०२२/प्र.क्र. ५६ /आस्था-४ दिनांक :- ०१ मार्च, २०२३

प्रति.

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, नंदूरबार

विषय :- रिट याचिका क्रमांक ९६४३/२०२१
पुरुषोत्तम वसंत काळे व इतर विरुध्द महाराष्ट्र शासन

संदर्भ :- आपले पत्र क्रमांक जिपनं/शिक्षण/लेखा/एकस्तर/२५०/२०२१, दिनांक २३-११-२०२१

महोदय,

विषयांकित प्रकरणी सामान्य प्रशासन विभागाने खालील प्रमाणे अभिप्राय दिले आहेत.

दिनांक ०६-८-२००२ च्या आदिवासी/नक्षलग्रस्त क्षेत्रात कार्यरत कर्मचाऱ्यांना एकस्तर वेतनश्रेणी मंजूर करण्याच्या शासन निर्णयातील मुद्दा क्र.३ (७) मधील तरतूद स्वयंस्पष्ट आहे. त्यानुसार आदिवासी क्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यास साप्रविच्या दिनांक ६-८-२००२ च्या शासन निर्णयानुसार जर एकस्तर वरिष्ठ वेतनश्रेणी लागू करण्यात आली असेल व त्यानंतर त्याची मुळ पदावर बारा वर्षाची सेवा पूर्ण झाली या कारणास्तव तो आश्वासित प्रगती योजनेंतर्गत वरिष्ठ श्रेणी लागू करण्यास पात्र झाल्यास तरी त्याला यापुर्वीच एकस्तर योजनेतर्गत वरिष्ठ श्रेणी देण्यात येत असल्याने पुन्हा आश्वासित प्रगती योजनेखाली वेगळयाने वरिष्ठ वेतनश्रेणी लागू करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

आणि VICE VERSA

आदिवासी क्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यास, साप्रविच्या दिनांक ०६-०८-२००२ च्या शासन निर्णयानुसार एकस्तर वरिष्ठ वेतनश्रेणी योजना सुरु होण्यापूर्वीच अथवा तो यापुर्वी बिगर आदिवासी भागात कार्यरत असताना, त्याला आश्वासित प्रगती योजनेंतर्गत तो धारण करीत असलेल्या मुळ पदाच्या वरिष्ठ

पदाच्या पदोन्नतीची वेतनश्रेणी देण्यात येत असेल व आता साप्रविच्या दिनांक ०६-०८-२००२ च्या शासन निर्णयानुसार तो आदिवासी भागात कार्यरत आहे, या कारणास्तव त्याला एकस्तर वरिष्ठ वेतनश्रेणी अनुज्ञेय असली तरी तो आधीपासून आश्वासित प्रगती योजनेंतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ घेत असल्याने त्याला एकस्तर वरिष्ठ वेतनश्रेणी योजनेंतर्गत पुन्हा वेगळयाने वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ देण्याचा प्रश्न उद्भवत नाही. थोडक्यात आदिवासी/नक्षलग्रस्त क्षेत्रात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यास प्रोत्साहन म्हणून एकस्तर वेतनश्रेणीचा लाभ अथवा आश्वासित प्रगती योजनेचा लाभ अनुज्ञेय असून दोन्ही लाभ देणे अभिप्रेत नाही. त्यामुळे त्या अनुषंगाने साप्रविच्या दिनांक ०६-०८-२००२ च्या शासन निर्णयातील मुद्या क्र. ३ (७) येथे तशी तरतुद केलेली आहे.

२. तसेच सदर प्रकरणी वित्त विभागाने खालीलप्रमाणे अभिप्राय दिले आहेत.

ज्या कर्मचाऱ्यास एकस्तर वरिष्ठ वेतनश्रेणी लागू करण्यात आली असेल , त्याला आश्वासित प्रगती योजना लागू झाल्यास, त्याची एकस्तर वेतनश्रेणी काढून त्याला आश्वासित प्रगती योजनेचा लाभ अनुज्ञेय करणे अपेक्षित नाही. तर तो आदिवासी भागात कार्यरत असेपर्यंतच त्याला एकस्तर वेतनश्रेणीचा लाभ देणे अपेक्षित आहे.

दिनांक १४ मे, २०१९ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये खालीलप्रमाणे स्पष्ट करण्यात आलेले आहे :-

" *(अ ) दिनांक* १ जानेवारी, २०१६ पूर्वी एकस्तर पदोन्नती योजनेचा लाभ मिळालेल्या व दिनांक १ जानेवारी , २०१६ रोजी अथवा त्यानंतर आदिवासी / नक्षलग्रस्त क्षेत्रात कार्यरत कर्मचाऱ्यांची वेतननिश्चिती :-

अशा प्रकरणी संबंधित कर्मचारी दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी धारण करीत असलेल्या मूळ पदाची वेतन संरचना ( वेतनबँड आणि ग्रेड वेतन ) तसेच एकस्तर पदोन्नती योजनेंतर्गत मिळालेली वेतन संरचना ( वेतनबँड आणि ग्रेड वेतन ) या दोन्ही वेतन संरचना महाराष्ट्र नागरी सेवा ( सुधारित वेतन ) नियम, २०१९ नुसार सुधारित करण्यात यावा.

(ब ) दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी अथवा त्यानंतर आदिवासी / नक्षलग्रस्त क्षेत्रात कार्यरत असलेल्या व एकस्तर पदोन्नती योजनेचा लाभ मिळालेल्या कर्मचाऱ्यांची वेतन निश्चिती :-

अशा प्रकरणी प्रथमत: दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी संबंधित कर्मचारी धारण करीत असलेल्या मूळ पदाची वेतन संरचना ( वेतनबँड आणि ग्रेड वेतन ) महाराष्ट्र नागरी सेवा ( सुधारित वेतन ) नियम, २०१९ नुसार सुधारित करण्यात यावी. तदनंतर मूळ पदाच्या सुधारित वेतनस्तरातून ( सुधारित वेतन मॅट्रीक्समधील वेतन स्तर ) एकस्तर पदोन्नती योजनेंतर्गत अनुज्ञेय सुधारित वेतन स्तरामध्ये वेतननिश्चिती करण्यात यावी "

वरील (अ) (ब) मध्ये नमूद दोन्ही प्रकरणी सुधारित वेतन मॅट्रिक्समधील वेतन स्तरामध्ये (pay Level in Revised Pay Matrix) एकस्तर पदोन्नती योजनेचा लाभ सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ०६ ऑगस्ट, २००२ रोजीच्या शासन निर्णयानुसार अनुज्ञेय राहील असे स्पष्टपणे नमूद करण्यात आलेले आहे.

३. तरी सामान्य प्रशासन विभागाच्या व वित्त विभागाच्या उपरोक्त अभिप्रायानुसार रिट याचिका क्रमांक ९६४३/२०२१ मध्ये नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

आपला,

(सु.दे.आंबेकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

ISSUED
1-3-23

प्रत :-

आस्था-४ संग्रहार्थ